# समिती दर्पण

**ऑक्टोबर २०२५**

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


### समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात १२०० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# समाजाच्या दातृत्वातून मुलींच्या स्वप्नांना बळ

## श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे वसतिगृह, पुसाळकर हॉलचे उद्घाटन







"मला माझ्या विद्यार्थ्यांचा अभिमान वाटतो. भारताबाहेर राहूनही त्यांनी आपल्या मातीशी नाळ कायम ठेवत, या भूमीतील मुलींच्या शिक्षणाला हातभार लावण्यासाठी समितीच्या वसतिगृहाच्या उभारणीत मोठा वाटा उचलला आणि मानवतेचे खऱ्या अर्थाने दर्शन घडविले..."

हे उद्गार आहेत मुंबई आयआयटीमधील निवृत्त प्राध्यापक यशोदाताई आपटे यांचे. निमित्त होते विद्यार्थी साहाय्यक समितीच्या श्रीमती लतिका जयवंत गायतोंडे मुलींच्या वसतिगृहाच्या कोनशिला अनावरणाचे. यशोदाताईंचे जावई आणि विद्यार्थी अमेरिकास्थित गिरीश गायतोंडे आणि कन्या विभावरी गायतोंडे यांनी मोठी देणगी देत या वसतिगृहाचा पाया भक्कम केला, त्यावर अनेक देणगीदारांनी एकेक वीट रचत कळस चढविला आणि ३३६ विद्यार्थिनींच्या निवासाची सोय असलेली ही पाच मजली सुंदर इमारत आकाराला आली. लजपत संकुलात १३ ऑक्टोबर रोजी झालेल्या या कार्यक्रमाला गायतोंडे दांपत्यासह समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, देणगीदार प्रीती राव, तनुजा पुसाळकर, नितीन कारिआ, हर्षल मोरडे मराठवाडा मित्र मंडळचे अध्यक्ष शिवाजीराव गणगे, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विश्वस्त भाऊसाहेब जाधव, संजय अमृते, तुकाराम गायकवाड उपस्थित होते. प्रास्ताविक विश्वस्त डॉ. मकरंद फडके यांनी केले. सूत्रसंचालन विनया देसाई यांनी केले. याच वसतिगृहातील पुसाळकर हॉलचे उद्घाटनही यावेळी झाले.

“ समितीत प्रत्येक विद्यार्थ्याची शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक जडणघडण होते. समितीत ज्या पद्धतीने विद्यार्थी घडतात, अशा पद्धतीचे काम करणारी एकही संस्था देशात नाही.
- **प्रतापराव पवार,** अध्यक्ष, विद्यार्थी साहाय्यक समिती

“ माझ्या आयुष्यावर आईचा खूप मोठा प्रभाव आहे. तिच्यामुळेच मी मोठी यशोशिखरे गाठू शकलो. ग्रामीण भागातील गरजू मुलींसाठी आईच्या नावाने वसतिगृह उभारले जाणे, हेच आईचे मूर्तरुपी स्मारक आहे.
- **गिरीश गायतोंडे,** अमेरिकास्थित देणगीदार

“ समितीच्या विद्यार्थिनींमध्ये ‘प्राईड ऑफ ओनरशिप’ दिसून येते. एकमेकींच्या मदतीने मुली पुढे येत आहेत. महिलाच महिलांच्या मैत्रिणी असतात, हे लक्षात ठेवून मुलींनी मुलींना मदत करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.
- **विभावरी गायतोंडे,** अमेरिकास्थित देणगीदार

### यशस्वी माजी विद्यार्थिनींचा गौरव

समितीतील संस्कारांमुळे आपली जडणघडण झाली, असे मानणाऱ्या सध्या आपापल्या क्षेत्रात यशोशिखरावर असणाऱ्या समितीच्या माजी विद्यार्थिनींचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला. स्नेहा फडके (बँकिंग), अश्विनी सानप (पोलीस दल), डॉ. संगीता बर्वे (साहित्य), सुरेखा भणगे (प्रशासकीय सेवा), गायत्री पाठक (सामाजिक) यांना मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

### देणगीदारांविषयी कृतज्ञता

या वसतिगृहाच्या उभारणीसाठी अनेकांनी आर्थिक साह्य तसेच अनेक कामांच्या माध्यमातून योगदान दिले. हे सर्व देणगीदार आणि साहाय्यदात्यांचा नामोल्लेख करून त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# नक्षीदार रंगीत पणत्यांनी उजळले ‘प्रेमाचे घर’

## चौधरी वसतिगृहातील मुलींच्या उपक्रमाला अनाम ग्राहकाची अशीही दाद

अहिल्यानगरमध्ये प्रेमाचे घर म्हणून संबोधली जाणारी ‘स्नेहालय’ ही सामाजिक सेवाभावी संस्था यंदा दिवाळीत समितीच्या कै. मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहातील मुलींनी सुंदर नक्षीकाम करून रंगविलेल्या हजार पणत्यांनी उजळली.

अहिल्यानगरमध्ये दोन वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या वसतिगृहात गरजू, होतकरू विद्यार्थिनींची निवास व भोजनाची सोय झालेली आहे. या मुलींना अर्थसाह्य व्हावे, या उद्देशाने पणत्या रंगवून त्याची बाजारात विक्री करण्याचा उपक्रम राबविण्यात आला. शिक्षणासाठीची मुलींची ही धडपड पाहून एका ग्राहकाचे मन हेलावले. त्यांनी क्षणाचाही विचार न करता उर्वरित हजार पणत्या विकत घेतल्या व त्या स्नेहालय संस्थेत नेऊन देण्यास सांगितले. त्या संस्थेतील मुलांची दिवाळी तुमच्या स्वाभिमानाच्या पणत्यांनी प्रकाशमय होऊ दे, असे सांगणाऱ्या त्या सद्गृहस्थांनी स्वतःचे नाव मात्र अज्ञात ठेवले.

समितीच्या वसतिगृहात राहणाऱ्या मुली गरीब शेतकरी कुटुंबातील आहेत. नुकत्याच




झालेल्या अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान झाले. त्यामुळे स्वतः कष्ट करून कुटुंबाला हातभार लावण्याची कल्पना त्या ग्राहकास भावली आणि या पणत्या आपल्यापेक्षा गरीब आणि अनाथ असणाऱ्या विद्यार्थ्यांना द्याव्या, म्हणजे आपण त्या मुलांपेक्षा कितीतरी चांगले जीवन जगत आहोत, याची जाणीव मुलींना होईल, ही त्यांची भावना होती. मधुभाऊ चौधरी वसतिगृहातील विद्यार्थिनींनी स्वतः जाऊन पणत्या स्नेहालय संस्थेच्या स्वाधीन केल्या. या उपक्रमाला समितीचे कार्यकर्ते नंदकुमार देशपांडे, सौ. सुनीता झिंजाड, शिवाजीराव बोलभट, रवींद्र देशपांडे, सौ. विद्या सूर्यवंशी यांनी प्रोत्साहन दिले.

# सुटीत गावी जाता न आलेल्या विद्यार्थ्यांची दिवाळी झाली गोड

## माजी विद्यार्थी मंडळातर्फे फराळ वाटप कार्यक्रम

अनेक महाविद्यालयीन परीक्षा दिवाळीनंतर लगेचच असतात, त्यामुळे समितीतील काही विद्यार्थी-विद्यार्थिनी दिवाळीसाठी घरी जाऊ शकत नाहीत. या मुलामुलींना घरच्याप्रमाणेच दिवाळी समितीत साजरी करता यावी, त्यांनाही सणाच्या निमित्ताने गोडधोड खाता यावे, यासाठी माजी विद्यार्थी मंडळातर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही दिवाळी फराळ वाटप उपक्रम राबविण्यात आला.

परीक्षेमुळे दिवाळीच्या सुटीत गावी न जाता समितीत राहणाऱ्या २५ विद्यार्थ्यांसाठी माजी विद्यार्थी मंडळातर्फे आठवडाभर पुरेल, एवढ्या दिवाळी फराळाची व्यवस्था करण्यात आली. लक्ष्मीपूजनाच्या दिवशी २१ ऑक्टोबरला सकाळी लजपत भवन येथे फराळ वाटपाचा कार्यक्रम झाला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे, देविदास टिळे, जिभाऊ शेवाळे, निसार चौगुले, धनंजय देशपांडे, राजेंद्र ततार, तसेच माजी विद्यार्थी व कुटुंबीय उपस्थित होते. फराळाचा आस्वाद घेत आजी- माजी विद्यार्थ्यांच्या गप्पा रंगल्या. अनुभवांची देवाण- घेवाण झाली.



तयाचा वेलू...

# परिसस्पर्शाने उजळले आयुष्य...

इंजिनीअर होऊन शहरात नोकरी मिळालेली असतानासुद्धा, कायम तिथेच न राहता, आपल्या गावी व्यवसाय करण्यासाठी परत जाणारे लोक विरळा आणि आपल्या मुलाला तशी शिकवण देणारे, व्यवसायात त्याची साथ मिळण्याचे भाग्य लाभलेले तर अजूनच विरळा..!

ज्ञानेश्वर गटकळ हे त्यापैकी एक. त्यांचे गाव राजुरी, तालुका जुन्नर. आईवडिलांचा एकुलता एक मुलगा. पण त्यांच्याच शब्दांत सांगायचे, तर "घरी अठरा विश्वे दारिद्र्य. इतकं की आईवडिलांचे उपास हे फक्त देवासाठी नव्हते. पैसेच नसायचे! वडील दगडखाणीवर सालानं काम करायचे, महिना शंभर रुपये मिळायचे, त्यातले सत्तर माझ्यासाठी ठेवून तीस रुपयांत महिना चालवायचे. आईवडील दोघंही निरक्षर, पण अडाणी नव्हते. त्यामुळं माझ्या शिक्षणावर त्यांचा कटाक्ष असायचा."

ज्ञानेश्वर यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण राजुरीतील जिल्हा परिषद शाळेत झाले. दहावीनंतर गावात शिक्षणाची सोय नव्हती. त्यामुळे आता शिक्षण संपले, आपण वडिलांना हातभार लावायचा, असे समजून त्यांनी नऊ रुपये रोजावर एका शेतकऱ्याकडे सकाळी सात ते संध्याकाळी सात काम धरले. शाळेत दहावीचा निकाल घ्यायलासुद्धा



गेले नाहीत. शाळेतील दोन शिक्षक जिजाभाऊ विष्णू औटे आणि शिरोळे यांनी ज्ञानेश्वर यांना पुढे काय, कुठे आणि कसे शिकायचे, याचा रस्ताच आखून दिला. एवढेच नाही तर दोनशे रुपयेही दिले. तेव्हा एसटीचे जुन्नर ते पुणे तिकीट सव्वाचार रुपये होते. गावातील डॉ. चंद्रकांत कणसे हे समितीचे माजी विद्यार्थी. शिक्षकांनी ज्ञानेश्वर यांना त्यांच्याकडे पाठविले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे ज्ञानेश्वर यांना आपटे प्रशाला आणि समितीत ॲडमिशन मिळाली.

ज्ञानेश्वर सांगतात, "समितीमधला पहिला आणि दुसरा दिवस मी कधीच विसरणार नाही. मी दोन मित्रांसह समितीत पोचलो, दारातच तांबोळी सर भेटले. मी म्हणालो, आम्ही एकाच गावचे आहोत, मित्र आहोत आम्हाला एक खोली द्या. त्यावर ते म्हणाले, अरे, तिघे तीन खोल्यांत राहा म्हणजे तुम्हाला आणखी मित्र मिळतील! पण तरीही आम्हाला इतरांबरोबर राहणे अवघड वाटत आहे, हे कळल्यावर त्यांनी काही दिवस एक खोली दिली."

"समितीमधला दुसरा दिवस हा पहिल्या आणि शेवटच्या शिक्षेचा! बाल्कनीमध्ये सकाळी ब्रश करत सज्ज्यावर थुंकत होतो... गावातल्यासारखंच... तांबोळी सरांनी पाहिलं तेव्हा, होस्टेलचे सगळे जिने स्वच्छ करण्याची शिक्षा दिली होती. त्यानंतर मात्र कुठलीही गोष्ट करताना आधी विचार करायला हवा, हे मनात अगदी कायमचं ठसलं!"

ज्ञानेश्वर यांना गावी शारीरिक कष्ट करण्याची सवय होती. पण इथे त्या कष्टानंतर रुचकर, दोन्ही वेळा पोटभर जेवण मिळत होते आणि खोलीत गादीवर झोपायला मिळत होते. स्वच्छता, मेस, स्टोअर, ॲडमिनिस्ट्रेशन ते अगदी व्हाईस रेक्टरपर्यंत सगळी कामे त्यांनी केली. तांबोळी सरांना पसंत पडेल, असेच काम करायची सवय लागली. त्यातून सरांचा सर्वात लाडका विद्यार्थी, ही पदवी मिळाली.

पाल्य- पालक योजनेबद्दल ज्ञानेश्वर सांगतात, "पहिल्या पालक डॉ. पाटणकर. त्यांच्याकडं भेटायला जायचो, तेव्हा त्यांच्याकडं आलेल्या गरोदर पेशंटसमवेत बसायला लागायचं. त्यामुळं खूप अस्वस्थ वाटायचं. तसं मी तांबोळी सरांना सांगितल्यावर त्यांनी मला दुसरे पालक दिले. ह्या पालकांना मराठी येत नव्हतं व माझी इंग्लिशची बोंबाबोंब! तरीही त्यांनी अत्यंत चांगल्या पद्धतीनं मला मार्गदर्शन करण्याचा प्रयत्न केला. तिसऱ्या वर्षी माझे पालक खळदकर नावाचे एक बिझनेसमन होते. तिथंच माझ्यातील व्यवसाय करण्याची कळी फुलली. आपल्याला बिझनेसच करायचा आहे, हे नक्की झालं. त्यानंतर समितीमध्ये राजाभाऊ पटवर्धन, गिंडी सर, निर्मलाताई आणि महत्त्वाचे म्हणजे तांबोळी सर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले."

समितीमध्ये असताना निर्मलाताईंच्या विविध उपक्रमांमुळे ते भारावून गेले होते. तिथे येणाऱ्या पाहुण्याकडून खूप काही शिकायला मिळाले. करिअरचे मार्ग माहित झाले. बारावीनंतर त्यांनी सिव्हिल इंजिनीअरिंग केले आणि लगेच त्यांना नोकरी मिळाली. नोकरीच्या पहिल्या दोन वर्षांत त्यांनी गावी स्वतःचे घर बांधले. स्लॅबवाले गावातले पहिले घर! 'गावात आता राजवाड्याइतकी मोठी घरं झाली आहेत, पण आमचं घर अजूनही बंगला म्हणून ओळखलं जातं,' असे ते अभिमानाने सांगतात.

ज्ञानेश्वर शेती व्यवसाय करतातच, पण त्याबरोबरीने बांधकाम, त्यासाठी लागणारी मशिनरी भाड्याने देणे आणि बिल्डिंग मटेरियलचा पुरवठा असे इतर व्यवसायही आहेत. समितीमध्ये शिकलेली योगासने, प्राणायाम ते अजूनही करतात. प्राणायामामुळे मन एकाग्र ठेवायला मदत होते. मार्ग काढणे सोपे जाते. गोष्टी सहजसोप्या होतात, वेळ वाचतो, हा त्यांचा अनुभव. कृष्णाबद्दल वाचायला ज्ञानेश्वर यांना आवडते. कृष्णाचा बारकाईने अभ्यास केला तर प्रत्येक प्रश्नाचे उत्तर मिळते, हा त्यांचा विश्वास त्यांनी आपल्या मुलालाही दिला आहे.

समाजऋणातून उतराई होण्यासाठी वेगवेगळ्या सामाजिक कार्यात ते सहभाग घेतात. समितीला मदत करण्याबरोबरच समवेदना ह्या गरीब रुग्णांसाठी काम करणाऱ्या संस्थेसाठीही ते काम करतात. जुन्नर परिसरातील इंजिनीअरिंग कॉलेजमध्ये व्यवसाय मार्गदर्शन करतात.

"परिसस्पर्श" तांबोळी सरांविषयी त्यांच्या वाढदिवसानिमित, मुलांनी त्यांच्याबद्दल लिहिलेल्या लेखांच्या पुस्तकाचं नाव! हेच नाव ज्ञानेश्वर यांनी आपल्या लेखाला दिले होते. हा परिसस्पर्श, ज्याने एका खरोखर दरिद्री कुटुंबातील मुलाचे यशस्वी उद्योजकात रुपांतर केले... तो तांबोळी सरांचा तर आहेच पण समितीचाही आहे. त्याबद्दल ज्ञानेश्वर यांच्या मनात अपार कृतज्ञता आहे.

**(शब्दांकन- माधवी कुलकर्णी)**

# समितीत साहसी उपक्रमांचा नवा अध्याय!

## हरिश्चंद्रगड ट्रेकच्या प्रेरणेतून ॲडव्हेंचर क्लबची स्थापना

'ट्रेक म्हणजे फक्त डोंगर चढणे नाही, तर स्वतःला शोधण्याचा आणि जीवनाला नवी दिशा देण्याचा प्रवास आहे,' याचा प्रत्यय नुकताच समितीतील विद्यार्थ्यांना आला. विद्यार्थी विकास केंद्राच्या 'Trek with Purpose' समितीच्या वतीने ४ व ५ ऑक्टोबर रोजी हरिश्चंद्रगड येथे ट्रेकचे आयोजन केले होते. या उपक्रमात २५ मुले व ३६ मुली असे ६१ विद्यार्थी सहभागी झाले.

या ट्रेकमुळे विद्यार्थ्यांमध्ये संघभावना, नेतृत्वगुण, आत्मविश्वास आणि जबाबदारीची जाणीव निर्माण झाली. 'शिकत शिकत आनंद घेणे,' ही संकल्पना या ट्रेकमधून साकारली. या यशस्वी उपक्रमातून प्रेरणा घेत, विद्यार्थी विकास केंद्रांतर्गत 'Adventure Club'ची स्थापना करण्यात आली आहे. या क्लबद्वारे विद्यार्थ्यांमध्ये साहस, स्वावलंबन आणि नेतृत्वगुण विकसित करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. डिसेंबरमध्ये ३५ विद्यार्थ्यांसाठी 'बेसिक रॉक क्लाइंबिंग आणि माऊंटनिअरिंग सर्टिफिकेट कोर्स' आयोजित करण्यात येणार आहे.



कविता

- साक्षी नेटके
मधुभाऊ चौधरी वसतिगृह अहिल्यानगर

### समिती

शोध निवाऱ्याचा होता,
कुटुंब मिळालं
पाऊल सर्वांगिण शिक्षणातून
युवा सक्षमीकरणाकडं निघालं...
स्वच्छता, समता, श्रमप्रतिष्ठा यांसोबत,
योगाच्या साथीनं सकारात्मक सकाळ उगवते...
मायेची ऊब, प्रेमाचा धाक, शिस्तीचा धडा
आणि विविके, उद्योजकता, गटचर्चा देतात विकासाला वाटा...
अर्ध्या तासाचं काम,
प्रामाणिकपणाचा आरसा दाखवते,
सण- उत्सवाचं साजरीकरण नव्या दृष्टिकोनाला जन्म देते...
पाल्य- पालक योजनेने नात्यांचे धागे गुंफले,
'कमवा- शिका'मधून स्वावलंबनाचे मोती मनात साठले...
कृतज्ञतेचा सुवास अंगी भिनला,
समाज बांधिलकीचा खरा अर्थ इथंच समजला...
समिती म्हणजे
उत्साहाचा झरा, समाजसेवेचा ठेवा!!!

# समितीच्या दैनंदिन उपक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांचे कौतुक





विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण व्यक्तिमत्त्व विकासासाठी विद्यार्थी साहाय्यक समितीत विविध उपक्रम राबविले जातात. हे उपक्रम प्रत्येक विद्यार्थी- विद्यार्थिनीसाठी अनिवार्य असतात. मात्र काही विद्यार्थी यामध्ये सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी बजावतात. समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर यांच्या संकल्पनेतून गेल्या दोन वर्षांपासून अशा गुणवंत विद्यार्थ्यांची वसतिगृहनिहाय निवड करून त्यांना गौरविण्यात येते.

यंदा ८ ऑक्टोबर रोजी लजपत संकुलातील पुसाळकर हॉलमध्ये लजपत, पीडी कारखानीस आणि हरिभाऊ फाटक वसतिगृहातील गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक समारंभ झाला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दीपक शिकारपूर उपस्थित होते. तसेच डॉ. ज्योती गोगटे, श्री. रंजनकर हेही उपस्थित होते.

ज्या विद्यार्थ्यांचे अवलोकन चांगले आहे, वसतिगृहातील त्यांची वर्तणूक, योगा, चार तास काम, पाल्य- पालक, कमवा शिका योजनेतील सहभाग आणि इतर काही चांगल्या गोष्टी आणि सवयी आहेत, अशा विद्यार्थ्यांची निवड केली जाते. या उपक्रमात निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये अधिक सुधारणा होऊन ते अधिक उत्तम बनतात व त्यांच्याकडे बघून इतरही विद्यार्थ्यांमध्ये सुधारणा होते, असे दिसून आले आहे.

डॉ. आपटे वसतिगृहात झालेल्या कार्यक्रमाला तुषार रंजनकर, दिनकर वैद्य, जिभाऊ शेवाळे, सुप्रिया केळवकर, सीमा होस्कोटे, वासंती नाटेकर, अनिता कहाते, सुनंदा पाटील तसेच पर्यवेक्षिका उपस्थित होत्या. मुलींच्या नवीन वसतिगृहात (बी विंग) झालेल्या कार्यक्रमाला समितीचे माजी विद्यार्थी श्रीकृष्ण आनंदराव वाडेकर, तुषार रंजनकर, दिनकर वैद्य, दुर्गेश पवार उपस्थित होते.

